दैनिक
# लोक आरंभ
www.lokaarambh.com
संपादक: राहुल मारोतीराव वाईकर
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
बीड | वर्ष - ०४ थे | अंक १०७ | मंगळवार ७ एप्रिल २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | पान ४ | किंमत २ रू
Beed | year - ०4 th | Issue107 | Tuesday 7 April 2026 | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | Page 4 | Price 2

# भारताने भर समुद्रात टाकला डाव!
## पाकिस्तानकडे जाणारं जहाज इराणने अडवलं

### जहाज 9 एप्रिलला मुंबईत येणार

समोर आलेल्या माहितीनुसार, सेंट किट्स अँड नेविस देशाचे हे जहाज 23 मार्च रोजी यूएईमधील शारजाह येथून पाकिस्तानातील कराचीकडे निघाले होते. हे जहाज होर्मुझच्या सामुद्रधुनीत पोहोचताच प्रवेश करताच इराणच्या IRGC नौदलाने त्याला वेढा घातला. या जहाजाला पुढे जाण्यासाठी परवानगी नाही असं सांगण्यात आलं. आता इराणच्या या कडक भूमिकेनंतर जहाजाने आपला मार्ग बदलला आहे. VesselFinder आणि MarineTraffic च्या माहितीनुसार हे जहाज आता सुमारे 10-11 नॉट्स वेगाने मुंबईकडे येत आहे. ते 9 एप्रिलपर्यंत भारताच्या किनाऱ्यावर पोहोचण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे भारताचा फायदा झाला असून पाकिस्तानला मोठा धक्का बसला आहे.

इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे आखाती देशांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण मिळवले आहे, त्यामुळे या भागातून प्रवास करणाऱ्या जहाजांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. या युद्धामुळे संपूर्ण जगाच्या तेल वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अशातच आता भर समुद्रात एक अशी घटना घडली आहे, ज्यामुळे पाकिस्तानला जबर हादरा बसला आहे, तर भारताला लॉटरी लागली आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीत नेमकं असं काय घडलं ज्यामुळे भारताला मोठा फायदा झाला? याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.


पाकिस्तानकडे जाणारं जहाज... होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या जहाजांना

इराणची परवानगी घेणे गरजेचे आहे. अशातच आता पाकिस्तानचे सेलेन नावाचे जहाज अन्नसामग्री घेऊन कराची बंदराकडे निघाले होते. मात्र, होर्मुझच्या सामुद्रधुनीत पोहोचताच इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डने ते थांबवले. या जहाजाला पुढे जाण्यापासून रोखण्यात आले. त्यानंतर आता अशी माहिती समोर आली आहे की, पाकिस्तानकडे जाण्याऐवजी हे जहाज भारतातील मुंबईच्या दिशेने वळवण्यात आले आहे. आता हे जहाज पुढील दोन दिवसांत ते मुंबईत पोहोचण्याची शक्यता आहे. या एका घटनेमुळे पाकिस्तान-इराण संबंधांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.


# बीड पोलिसांचा संवाद वरील क्यू आर कोड प्रकल्प यशस्वी उपक्रम नागरिकांना वापराचे पोलिसांचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी बीड जिल्हा पोलीस दलामार्फत नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने मसंवाद वरील क्यू आर कोड प्रकल्पफ हा उपक्रम दिनांक ०६ फेब्रुवारी २०२५ पासून प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना सुलभ आणि जलद पद्धतीने तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. या प्रकल्पाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत एकूण ४००० तक्रारी/ फीडबॅक प्राप्त झाले आहेत आणि सर्व तक्रारींवर २४ तासांच्या आत कार्यवाही करून त्यांचे निराकरण करण्यात आले आहे. यामुळे पोलीस प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला असून, बीड पोलीस नागरिकाभिमुख सेवा देण्यात यशस्वी ठरत आहेत. या उपक्रमांतर्गत वरील क्यू आर

संवाद QR कोड

कोड विविध सार्वजनिक ठिकाणी, पोलीस ठाण्यांच्या परिसरात, सोशल मीडिया साईट्सवर तसेच शासकीय कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नागरिकांना आपल्या मोबाईलद्वारे वरील क्यू आर कोड स्कॅन करून थेट ऑनलाइन तक्रार नोंदविता येते. त्यामुळे पोलीस ठाण्यात प्रत्यक्ष जाण्याची गरज न पडता वेळ व श्रमांची बचत होत असून तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया अधिक सोपी व सुलभ झाली आहे. प्राप्त प्रत्येक तक्रारीची गांभीयनि दखल घेऊन संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी त्वरित कार्यवाही करीत आहेत. तक्रारींच्या स्वरूपानुसार फिर्यादींशी थेट संपर्क साधून आवश्यक ती चौकशी व योग्य कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक बीड, श्री नवनीत कावत यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, मसंवाद वरील क्यू आर कोड प्रकल्पफ हा नागरिकांसाठी तयार केलेला सोपा आणि प्रभावी मार्ग आहे. कोणतीही समस्या, तक्रार किंवा सूचना असल्यास वरील क्यू आर कोड स्कॅन करून त्वरित नोंदवावी. तसेच कोणतेही बेकायदेशीर कृत्ये, अवैध धंदेबाबत माहिती देण्यासाठीही या माध्यमाचा वापर करता येईल आणि माहिती देणाऱ्या नागरिकाची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. बीड पोलीस नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असून नागरिकांचा सहभाग आणि विश्वास हीच आमची ताकद आहे. बीड पोलीस दलाकडून सर्व नागरिकांना या उपक्रमाचा जास्तीत जास्त वापर करून स्वतःच्या समस्या वेळेत सोडवून घेण्याचे तसेच सुरक्षित व जबाबदार समाज घडविण्यात सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# कराड संजय अमृतराव साहेबांची PSI पदी पदोन्नती



अहमदपूर ः अहमदपूर तालुक्यातील चिखली गावाचे सपुत्र कराड संजय साहेबांनी प्रतिकुल परिस्थिती मध्ये 10 मार्च 1993 या वर्षात त्यांची नेमणूक प्रथम पोलिस म्हणून अहमदपूर येथे नेमणूक झाली. त्यानंतर ब-याच ठिकाणी अंत्यत कुशलेतेनी कामगिरी केली असून त्यांनी त्यांच्या डिपार्टमधील psi पदी पदोनत्ती झाल्यामुळे पोलीस स्टेशन अहमदपूर या ठिकाणी सरांचे बालमित्र सुदर्शन तांदळे ,मदन शेळके, किनकर सर ,भोपे शाम व शिवाजी नामपल्ले सर यांनी कराड साहेबांचा सत्कार केला.

# सरवर पिंपळगाव, हिवरा- 2 हिवरा -3,गंगामसला, मंजरथ या गोदावरीच्या घाटांवर वाळू माफियांचे साम्राज्य;

### बनावट पंचनाम्यांवर प्रशासनाची 'ढाल' — माजलगाव तालुक्यात गंभीर चित्र

माजलगाव प्रतिनिधी
माजलगाव : तालुक्यातील गोदावरी नदीवरील सरवर पिंपळगाव, हिवरा-2 व हिवरा-3, गंगामसला, मंजरथ या वाळू घाटांवर अवैध वाळू उपशाचा उद्योग दिवस-रात्र सुरू असून माफियांनी केणी, पोकलेन व जेसीबी यंत्रांच्या सहाय्याने नदीपात्राची अक्षरशः उध्वस्त अवस्था केली आहे. या सर्व प्रकारांकडे प्रशासनाने कथित 'पंचनाम्यांच्या' आडून दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. घाटनिहाय स्थिती चिंताजनक झाली आहे. सरवर पिंपळगाव, हिवरा - 2 हिवरा -3, गंगामसला, मंजरथ घाटावर उघडपणे यंत्रांचा वापर होत असून हायवा टिप्परची रांग लागत असल्याचे चित्र आहे. अनेक वेळा तक्रारी देऊनही पंचनाम्यात 'सर्व काही नियमानुसार' असल्याचे नमूद करण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

सरवर पिंपळगाव,हिवरा-2 हिवरा -3, गंगामसला, मंजरथ येथे रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होत असून पोकलेन व केणी यंत्रांचा सर्रास वापर होत आहे. पोलीस गस्त अपुरी असल्याने माफियांचे धाडस वाढल्याचे दिसते. या घाटावर मोठ्या प्रमाणात उत्खनन होऊन नदीपात्राचा नैसर्गिक आकार बदलत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पंचनामा संशयांच्या भोवऱ्यात स्थानिकांच्या मते, तक्रार दिल्यानंतर पथक येण्यापूर्वीच संबंधितांना माहिती मिळते. त्यानंतर घाटावरील यंत्रे काही काळासाठी हटवली जातात. पथक आल्यानंतर परिस्थिती 'सामान्य' दाखवून पंचनामा तयार केला जातो. पथक परतताच पुन्हा मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू होत असल्याची चर्चा होत आहे.

आर्थिक व पर्यावरणीय परिणाम दररोज लाखो रुपयांची वाळू उपसा होत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. यामुळे नदीकाठची शेती धोक्यात येत असून भूजल पातळीवरही परिणाम होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. आरटीओ व पोलीस यंत्रणेबाबतही प्रश्न स्थानिकांनी काही हायवा वाहनांवर एकाच क्रमांकाचा वापर होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याबाबत प्रादेशिक परिवहन विभागाने तपास करावा, अशी मागणी आता जनसामान्य माणसा कडून होत आहे. तसेच अवैध वाहतुकीवर कारवाई करताना दुजाभाव होत असल्याचाही आरोप काही वाहनधारकां कडून चर्चीला जात आहे. प्रशासनाकडून स्पष्टतेची अपेक्षा



या प्रकरणी जिल्हा प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करावी, पंचनाम्यांची पडताळणी करावी तसेच दोषी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

नागरिकांच्या प्रमुख मागण्या अवैध वाळू उपसा तात्काळ बंद करावा संबंधित यंत्रसामग्री जप्त करावी दोषी व्यक्तींवर गुन्हे दाखल करावेत घाटांवर संयुक्त पथकाची नियमित गस्त ठेवावी नुकसान भरपाई वसूल करावी माजलगाव तालुक्यातील गोदावरी नदीचे संवर्धन व अवैध वाळू उपशावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे. जनतेत प्रशासनाबद्दल चर्चा माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, एलसीबी पथक बीड, पोलीस प्रशासन यांना माफियांकडून हप्ता पोच होत असल्याची चर्चा सध्या पूर्ण तालुक्यात होत आहे .

# सावरगाव शिवारात अज्ञात वाहनाच्या धडकेत काळविटाचा जागीच मृत्यू

माजलगाव | प्रतिनिधी
माजलगाव-गढी रोडवरील सावरगाव शिवारात आज, दि. ६ एप्रिल २०२६ रोजी एका अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने एका काळविटाचा जागीच मृत्यू झाला. धावत्या वाहनाच्या धडकेत निष्पाप वन्यजीवाचा बळी गेल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सावरगाव शिवारातील मुख्य रस्त्यावर हे काळवीट रस्ता ओलांडत असावे किंवा पाण्याच्या शोधात आले असावे, अशा वेळी भरधाव वेगाने येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने त्याला जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की काळविटाचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर रस्त्यावर बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.

घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते नितीन फंदे यांनी तात्काळ वन विभागाचे अधिकारी संभाजी पारवे सर यांच्याशी संपर्क साधला माहिती मिळताच पारवे यांनी वन विभागाची गाडी घटनास्थळी रवाना केली. वन कर्मचाऱ्यांनी काळविटाचा मृतदेह ताब्यात घेऊन प्राथमिक तपासणी केली. पुढील तपास व कार्यवाही वन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, काळविटाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी (PM) धारूर या ठिकाणी पाठवण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे अधिकृत कारण स्पष्ट होईल. वन विभागाकडून या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे.रस्त्यावरील वन्यजीवांच्या सुरक्षेचा प्रश्नया घटनेमुळे माजलगाव-गढी रोडवर वन्यप्राण्यांच्या वाढत्या वावराचा आणि त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वाहन चालकांनी वन्यजीव क्षेत्रातून प्रवास करताना वाहनाचा वेग मर्यादित ठेवावा, असे आवाहन पर्यावरण प्रेमींकडून करण्यात येत आहे.

# अवकाळीसह गारपिटीने आंबा बागांचे कंबरडे मोडले!
## पंचनाम्यांसाठी प्रशासनाला मुहूर्त कधी मिळणार ? - अंगद दराडे यांचा सवाल

माजलगाव (विशेष प्रतिनिधी):
बीड जिल्ह्यात गेल्या आठवड्यात निसर्गाचे रौद्ररूप पाहायला मिळाले. अचानक झालेल्या हवामान बदलामुळे विजांच्या कडकडाटासह वेगवान वारे आणि गारपिटीने जिल्ह्याला झोडपून काढले. या अस्मानी संकटामुळे हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी पूर्णपणे कोलमडला आहे. विशेषतः माजलगाव तालुक्यातील तालखेड, हारकी निमगाव, राजेगाव या परिसरात आंबा फळबागांचे अतोनात नुकसान झाले असून, अनेक ठिकाणी फळांनी लगडलेली झाडेच मुळासकट उन्मळून पडली आहेत.

शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले
रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारी आणि कांदा या पिकांसह आंबा बागांवर शेतकऱ्यांची मोठी भिस्त होती. सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने अनेक कुटुंबांचे आर्थिक नियोजन याच उत्पन्नावर अवलंबून होते. मात्र, निसर्गाच्या कोपाने उभ्या पिकांच्या चिंधड्या झाल्याने आता मुलाबाळांची लग्ने कशी करायची, असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. वर्षभर पोटच्या मुलाप्रमाणे जपलेल्या फळबागा डोळ्यादेखत उद्ध्वस्त होताना पाहून बळीराजाला अश्रू अनावर झाले आहेत.



शासकीय अनास्थेवर अंगद दराडे यांची टीका एकी कडे शेतकरी दुहेरी संकटात सापडलेला असताना, दुसरीकडे शासन आणि प्रशासन मात्र अजूनही गाढ झोपेत असल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी अद्याप नुकसानीचे प्राथमिक पंचनामेही सुरू झालेले नाहीत. या संदर्भात बोलताना सामाजिक कार्यकर्ते अंगद दराडे यांनी संताप व्यक्त केला आहे. "प्रशासन अजूनही पंचनाम्यांसाठी मुहूर्त शोधत आहे का?" असा बोचरा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.



### तातडीने मदतीची मागणी

राज्यकर्त्यांच्या उदासीन धोरणामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. प्रशासनाने आता कागदी घोडे नाचवणे थांबवून विनाविलंब शेतावर जाऊन पंचनामे पूर्ण करावेत आणि पीडित शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदतीचा हात द्यावा, अशी आग्रही मागणी अंगद दराडे यांनी 'बोलताना केली आहे.

# परीक्षांच्या काळात 'पटपडताळणी'चा अट्टाहास कशासाठी?

## महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीचा शिक्षणमंत्र्यांना सवाल

### पटपडताळणीचा निर्णय रद्द करा-खंडेराव जगदाळे

मुंबई दि.6(प्रतिनिधी)- राज्यातील शाळांमध्ये सध्या वार्षिक परीक्षांचे वातावरण असून इयत्ता ९ वी, ११ वी आणि पायाभूत (PAT) चाचण्यांचे नियोजन सुरू आहे. अशा अत्यंत व्यस्त काळात शिक्षण विभागाने 'प्रत्यक्ष पटपडताळणी'चे आदेश दिल्याने शिक्षक आणि मुख्याध्यापकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. हा अघोरी निर्णय रद्द करावा किंवा पुढे ढलावा, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीने शिक्षण मंत्री ना. श्री. दादाजी भुसे यांच्याकडे केली आहे. समितीचे उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी या संदर्भात शिक्षण मंत्री आणि शिक्षण संचालकांना लेखी निवेदन पाठवून वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले आहे. शासनाने ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी PAT परीक्षांचे आयोजन केले आहे. याच काळात ९ वी आणि ११ वी च्या महत्त्वाच्या विषयांच्या परीक्षाही आहेत. अशा वेळी प्रत्यक्ष पटपडताळणी लादल्याने परीक्षेच्या कामात मोठी अडचण निर्माण



होणार आहे.
एका बाजूला विद्यार्थ्यांचे मूल्यमापन आणि दुसऱ्या बाजूला प्रशासकीय पडताळणी, अशा दुहेरी कात्रीत शिक्षक अडकले आहेत. यामुळे त्यांच्यावर विनाकारण मानसिक ताण येत असल्याची भावना निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. दुसरीकडे शासनाने आधीच ऑनलाइन संचमान्यता ग्राह्य धरून पदे निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. जेव्हा ऑनलाइनचा पारदर्शक पर्याय उपलब्ध आहे, तेव्हा पुन्हा प्रत्यक्ष पडताळणी करून वेळ आणि मनुष्यबळ वाया का घालवले जात आहे? असा सवाल ही विना अनुदानित शाळा कृती समितीने केला आहे. समितीच्या प्रमुख मागण्या:
१. सद्यस्थितीतील परीक्षांचा विचार करून प्रत्यक्ष पटपडताळणीचा आदेश तात्काळ रद्द करावा. २. ही प्रक्रिया पुढे ढकलून ती पुढील शैक्षणिक वर्षात ३० सप्टेंबरच्या पटसंख्येवर आधारित घेण्यात यावी.
३. वारंवार बदलणारे आदेश न काढता, शिक्षण विभागाने निश्चित अशी एकच पडताळणी प्रक्रिया ठेवावी. या निवेदनावर समितीचे अध्यक्ष एस. यू. म्हासकर, कार्याध्यक्ष आर. झेड. बावीसकर, राज्य संघटक पुंडलिक रहाटे, वैजिनाथ चाटे, जितेंद्र डोंगरे, विजयसिंह शिंदे, मुक्ता मोटे मॅडम आणि बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाध्यक्षांचे समर्थन आहे. आता शासन यावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे

# राहुरी पोटनिवडणुकीचं मैदान सोडलं?

## भाजप नेत्यांच्या भेटीनंतर तनपुरेंची प्रतिक्रिया, म्हणाले....

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना
राहुरीचे भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर ही जागा रिक्त झाली होती. याठिकाणी भाजपने त्यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी देऊ केली आहे. त्यांच्याविरोधात माजी राज्यमंत्री आणि शरद पवार गटाचे नेते प्राजक्त तनपुरे हे रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. मात्र, त्यापूर्वीच भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्राजक्त तनपुरे यांची भेट घेतली आहे.
रवींद्र चव्हाण आणि राधाकृष्ण विखे पाटील सोमवारी सकाळी अचानक प्राजक्त तनपुरे यांच्या भेटीसाठी पोहोचले. या तिन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा झाली. यावेळी रवींद्र चव्हाण यांनी प्राजक्त तनपुरे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरुन चर्चा करुन दिल्याचे समजते. त्यामुळे आता प्राजक्त तनपुरे निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतील, अशी चर्चा रंगू लागली आहे. आता प्राजक्त तनपुरे राहुरी पोटनिवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार की नाही, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.
भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि पालकमंत्र्यांनी मला विनंती केली आहे. विकासाचे प्रश्न मार्गी लावण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक आश्वासन दिले आहे. याबाबत मला कार्यकर्त्यांशी चर्चा करावी लागेल. माझा उमेदवारी अर्ज भरुन तयार आहे. ज्या मुद्द्यावर आपण निवडणूक लढवायचं म्हणतोय, तो मुद्दाच सोडवण्याची तयारी त्यांनी दाखवली असेल तर मला माझ्या सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन मला निर्णय घ्यावा लागेल, अशी प्रतिक्रिया प्राजक्त तनपुरे यांनी व्यक्त केली. त्यांचा एकूण सूर पाहता ते या पोटनिवडणुकीतून माघार घेतील, असे दिसत आहे.
प्राजक्त तनपुरे यांच्याशी चर्चा केल्यानंतर रवींद्र चव्हाण यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यांनी म्हटले की, महाराष्ट्रात एखाद्या लोकप्रतिनिधीचे निधन झाल्यानंतर त्याच्या घरातील कोणी निवडणुकीला सामोरे जात असेल तर ती पोटनिवडणूक बिनविरोध करण्याची परंपरा आहे. प्राजक्त तनपुरे, देवेंद्र फडणवीस, मी आम्ही सगळ्यांनी विधानसभेत एकत्र काम केले आहे. ते गेल्यावेळी राज्यात मंत्री म्हणून कार्यरत होते. राहुरी मतदारसंघातील विकासाचे विषय आणि समस्या एकत्रितपणे सोडवता येऊ शकतात. त्यामुळे प्राजक्त तनपुरे यांनी पोटनिवडणुकीतून माघार घ्यावी, अशी विनंती आम्ही त्यांना केली. ते आता त्याच्या कार्यकर्त्यांशी चर्चा करुन निर्णय घेतील, असे रवींद्र चव्हाण यांनी म्हटले

# नैसर्गिक आपत्तीग्रस्त कुटूंबाच्या भेटीला धस टेंभुर्णीत !

### सरपंच मिथुन डोंगरे यांनी कुटूंबाला अधिकची मदतीची अपेक्षा व्यक्त केली !

शिरूर कासार /प्रशांत बाफना: नुकतेच तालुक्यात अवकाळी वादळी वाऱ्यासह पावसाचे अस्मानी संकट आले होते या संकटात दोन कुटूंबात जिवीत हानी झाली होती , या आपत्तीग्रस्त कुटूंबाच्या भेटीला आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांचे चिरंजीव जयदत्त धस सोमवारी आले असता टेंभुर्णीचे सरपंच मिथुन डोंगरे यांनी आपत्ती ग्रस्त कुटूंबाला अधिकची मदत मिळावी अशी अपेक्षा धस यांचेकडे व्यक्त केली .
तालुक्यातील टेंभुर्णी गावात अवकाळी पावसात विज पडून रूस्तुम रामभाऊ यांचा बैल मरण पावला तसेच विजेचा शॉक लागून यशोदा अमोल शिरसाट यांचा



देखील मृत्यू झाला . या दोन्ही कुटूंबाचे



सांतवन करण्यासाठी जयदत्त धस हे सोमवारी आले असता सरपंच मिथून डोंगरे यांनी अधिकची मदत मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली असता जयदत्त धस यांनी तहसिलदार सुरेश घोळवे व महावितरणचे अभियंता यांना फोनवरून संपर्क करून मागणीचा विचार व्हावा असे सांगितले.
यावेळी मिथुन डोंगरे सोबत भिमदादा , पांडूरंग शिरसाट , सर्जेराव शिरसाट , बाळू शिरसाट, शहादेव शिरसाट, शिवनाथ भाऊ शिरसाट , गणेश शिरसाट , आदी ग्रामस्थ उपस्थित होते . लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून मिथुन डोंगरे करत असलेल्या कामाबाबत ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले

## संपादकीय

# सहानुभूतीची लाट एवढ्या लवकर

प्रशांत बाफना
अजितदादा पवार यांच्या निधनाची बातमी महाराष्ट्राला धक्का देणारी होती. परंतु त्यांच्या पश्चात सहानुभूतीची लाट निर्माण झाली व त्याचा लाभ सर्वात प्रथम सुनेत्रा पवार यांना झाला. तथापि, पक्षाचा रिमोट कंट्रोल आपल्या हातातच राहावा, यासाठी खा. प्रफुल्ल पटेल व खा. सुनील तटकरे यांनी खेळी करायला सुरुवात करताच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुंदोपसुंदी सुरू झाली. त्यामुळेच अनेक आमदार भयभीत झाले असून ते नेतृत्वाच्या शोधात पुन्हा एकदा शरद पवारांकडे जातात की काय अशी शक्यता निर्माण झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या या विचित्र राजकारणामुळे अजितदादा पवार यांच्या निधनानंतर सहानभूतीची निर्माण झालेली जबरदस्त लाट ओसरायला सुरुवात झाली, असे समजायला हरकत नाही. अजितदादा पवार एक दिलखुलास व्यक्तिमत्व होते. महाराष्ट्राच्या राजकारणात अनेकदा उपमुख्यमंत्री होणारा हा अवलिया मुख्यमंत्री होण्याच्या आतच जगाला सोडून कायमचा गेला. त्यांच्या पश्चात सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या. पण सत्तेचा रिमोट कंट्रोल किंवा आपल्या पक्षाचा रिमोट कंट्रोल आपल्याच हातात असावा, असा प्रयत्न अनेकांकडून सुरू झाला आणि पक्षात खळबळ सुरू झाली. एका बाजूला सुनेत्रा पवार तर दुसऱ्या बाजूला त्या वरचढ होऊ नये म्हणून प्रयत्न करणारे प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे असा हा खेळ बराच काळ सुरू आहे. या सर्व खेळाला वैतागून अनेक आमदारांनी शरद पवार यांची भेट घेतल्याची माहिती प्राप्त होत आहे. या सर्व डाव प्रतिडावाला वैतागून सुनेत्रा पवारांनी निवडणूक आयोगाला पत्र पाठवून मागील सर्व पत्रव्यवहार ग्राह्य धरू नये, अशी सूचना केली होती. प्रफुल्ल पटेल सुनील तटकरे यांना हा मोठा धक्का होता. परंतु त्याच पत्राचा आधार घेऊन आता सुनेत्रा पवारांनाच अडचणीत आणण्याचे प्रयत्न सुरू झाले आहे. त्यामुळे शेवटी स्वतःचेच पत्र मागे घेण्याची सुनेत्रा पवारांवर नामुष्की आली. अन्यथा पार्थ पवारांच्या खासदारकीला मोठा धोका निर्माण झाला असता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सध्या मोठ्या राजकीय घडामोडी घडत असून एका नव्या आणि अत्यंत रंजक वळणाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी थेट निवडणूक आयोगाला एक महत्त्वाचे पत्र पाठवले होते. या पत्रात त्यांनी अशी विशेष विनंती केली होती की, २८ जानेवारी ते १० मार्च या कालावधीत पक्षाकडून झालेला कोणताही पत्रव्यवहार ग्राह्य धरण्यात येऊ नये. पण या एका चुकीच्या पावलामुळे त्यांचे पुत्र पार्थ पवार आणि संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच मोठ्या कायदेशीर अडचणीत सापडला. सुनेत्रा पवार यांनी पाठवलेल्या या वादग्रस्त पत्राचा थेट परिणाम म्हणून १६ फेब्रुवारी रोजी सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी निवडणूक आयोगाला पाठवलेले अधिकृत पत्र थेट रद्दबातल ठरण्याची वेळ आली आहे. उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार यांनीच निवडणूक आयोगाशी पत्रव्यवहार केला होता. पण त्यापूर्वी पटेल-तटकरे यांच्या पत्राच्या आधारे पार्थ पवार यांच्या राज्यसभा खासदार पदासाठीची उमेदवारी देण्यात आली होती व संबंधित कागदपत्रे दाखल करण्यात आली होती. तसेच, त्यांच्या राज्यसभा निवडणुकीच्या एबी फॉर्मवर देखील याच नेत्यांच्या सह्या आहेत. जर सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांचे पत्र ग्राह्य धरले गेले नाही, तर पार्थ पवार यांची उमेदवारी आणि संपूर्ण कागदपत्रेच बेकायदेशीर ठरण्याची दाट शक्यता निर्माण झाली. या व्यतिरिक्त, २८ जानेवारी ते १० मार्च याच काळात पक्षात महत्त्वपूर्ण नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. यामध्ये स्वतः सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी, प्रफुल पटेल यांची राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी आणि सुनील तटकरे यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली होती. या सर्व निवडींचे ठराव आणि राष्ट्रीय कार्यकारिणीचे इतिवृत्त निवडणूक आयोगाला आधीच पाठवण्यात आले होते. त्यामुळे जर हा सर्व पत्रव्यवहार अवैध ठरला, तर पक्षांतर्गत संपूर्ण निवड प्रक्रियेवरच मोठे प्रश्नचिन्ह उभे राहील. सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे, हे पत्र पाठवताना सुनेत्रा पवार यांनी पक्षातील कोणत्याही वरिष्ठ नेत्याशी साधी चर्चादेखील केली नव्हती आणि या सर्व प्रक्रियेत पार्थ पवार यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे बोलले जात आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयात पक्षाच्या अस्तित्वाबाबत आणि चिन्हाबाबत कायदेशीर लढाई सुरू असताना, या पत्रामुळे पक्षाला मोठे नुकसान सहन करावे लागू शकते. ही गंभीर व कायदेशीर चूक काही नेत्यांनी जेव्हा सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांच्या निदर्शनास आणून दिली, तेव्हा कुठे त्यांना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले. त्यामुळे आता स्वतःच्याच चुकीची दुरुस्ती करत सुनेत्रा पवार यांनी १० मार्च रोजी दिलेले ते पत्र निरस्त करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे पुन्हा विनंती केली आहे. कोणताही मोठा राजकीय निर्णय घेताना वरिष्ठ आणि अनुभवी नेत्यांना विश्वासात घेणे किती आवश्यक असते, हे या घटनेवरून सिद्ध होते. घाईगडबडीत आणि विनाचर्चा घेतलेले निर्णय अनेकदा स्वतःसाठीच मोठा खड्डा खोदू शकतात. कायदेशीर बाबींमध्ये पक्षांतर्गत समन्वय नसल्यास भविष्यात अत्यंत मोठ्या संकटांना सामोरे जावे लागू शकते. सध्याच्या राजकीय घडामोडींमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अनेक अंतर्गत आव्हानांचा सामना करत आहे. या पक्षाला नेहमीच सुभेदारांचा पक्ष मानले जाते, जिथे अनेक मातब्बर नेते आपले मतदारसंघ मजबूत बांधून ठेवून निवडून येतात आणि त्यांना आपला एक पक्ष हवा असतो. मात्र, अजितदादा पवार यांच्या निधनानंतर पक्षात कोणीच कोणाचे ऐकत नाही, असे अस्थिर चित्र निर्माण झाले आहे. दोन गटांचे मनोमिलन ही तर फार दूरची गोष्ट आहे. सध्याच्या पक्षात मतदारसंघाचे प्रश्न, स्थानिक राजकारण आणि विशेषतः भाजप तसेच शिंदेसेना यांच्यासोबत कसे डील करायचे, यावर पूर्वी अजितदादांशी चर्चा होत असे. आता मात्र चर्चा कोणाशी करायची आणि त्यावर उपाय कोण सांगणार? असा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. पक्षाचे दोन ज्येष्ठ नेते आणि खासदार, प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरे यांच्यावरही अविश्वासाचे ढग दाटले आहेत. निवडणूक आयोगाला देण्यात आलेल्या पत्रावरून हा गोंधळ अधिकच वाढला आहे. पार्थ पवार यांनी दिल्ली मधील पत्रकार यांना हे पत्र मागे घेत असल्याचे सांगितले, तर मुंबई मध्ये असे कुठलेही पत्र परत घेणार नसल्याचे सांगत उलटसुलट माहिती दिली. दुसरीकडे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या दिल्ली दौऱ्यावर असताना त्यांनी प्रफुल्ल पटेल कुठे आहेत? या प्रश्नावर पत्रकारांना थेट उत्तर देणे टाळले, मात्र संध्याकाळी त्या पटेल यांच्याच घरी भोजनासाठी गेल्याचे कळते. या सर्व चित्रविचित्र घडामोडींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून त्याचा गंभीर परिणाम येत्या काही दिवसात महाराष्ट्राला पाहायला मिळेल, अशी शक्यता आता व्यक्त होत आहे! राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्वाची पोकळी?
खरं म्हणजे पुढील तीन वर्ष राज्यात कोणतीही निवडणूक नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांना सक्रिय ठेवण्यासाठी त्यांना कार्यक्रम देणे, रसद पुरवणे आणि छोटी-मोठी कामे देणे आवश्यक असते. कार्यकर्त्यांच्या दळणवळणाचा प्रश्न मिटला की मतदारसंघातील कामे आपोआप मार्गी लागतात. पण ही व्यवस्था आता कोण सांभाळणार? पटेल व तटकरे राज्यभर फिरले तरी संशयाच्या वातावरणात त्यांचे कोण ऐकणार आणि त्यांनी दिलेली पदे कायम राहतील का? प्रदेशाध्यक्ष किंवा इतर कोणाला भेटायचे, याची उत्तरे मिळत नाहीत. पूर्वी जाहीर सभेत दादांच्या उजव्या-डाव्या बाजूला कोण बसणार हे ठरवणारे आणि निधनानंतर सुनेत्रा पवार मुंबईला रवाना झाल्याची माहिती माध्यमांना देणारे सुनील तटकरे आता कुठे आहेत? राष्ट्रवादी काँग्रेसमधील हा विस्कळीतपणा केवळ नेतृत्वाची पोकळी दर्शवत नाही, तर पक्षाच्या भविष्यासाठी एक गंभीर धोक्याचा इशारा आहे. वेळेत योग्य संवाद व मार्गदर्शन न मिळाल्यास पक्षाचे मोठे नुकसान होऊ शकते

# प्राजक्त तनपुरेंची माघार !

## राहुरीच्या राजकारणात मोठी उलथापालथ!

### शरद पवार गटाकडून गोविंदराव मोकाटे रिंगणात

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना
राज्यात विधानसभा पोटनिवडणुकीचे वारे वाहत असतानाच अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी मतदारसंघातील राजकीय समीकरणे वेगाने बदलताना दिसत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रबळ दावेदार मानले जाणारे प्राजक्त तनपुरे यांनी अनपेक्षितपणे उमेदवारी अर्ज भरण्याचे टाळल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दरम्यान, ऐनवेळी शरद पवार गटाकडून गोविंदराव मोकाटे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याने या निवडणुकीला आता नवे वळण मिळाले आहे.
गेल्या काही दिवसांपासून प्राजक्त तनपुरे हे शरद पवार गटाकडून निवडणूक लढवतील, अशी निश्चिती होती. मात्र, अर्ज भरण्याच्या प्रक्रियेदरम्यान तनपुरे यांनी घेतलेली माघार सर्वांच्याच भुवया उंचावणारी ठरली आहे. विशेष म्हणजे, तनपुरे यांच्या वाड्या वर भाजपचे नेते राधाकृष्ण विखे-पाटील आणि रविंद्र चव्हाण यांनी भेट घेतल्याची चर्चा रंगली आहे. या भेटीनंतरच त्यांनी अर्ज न भरण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. या भेटीमुळे राहुरीच्या राजकारणात काही गुप्त 'समझोता' झाला आहे का? अशी चर्चा आता जनसामान्यात रंगू लागली आहे.
एकतर्फी वाटणाऱ्या या लढतीत अचानक गोविंदराव मोकाटे यांनी शरद पवार गटाकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे. मोकाटे हे देखील राहुरी स्थानिक असल्याने पवारांनी स्थानिक उमेदवाराचा पत्ता टाकत आपली रणनीती स्पष्ट केली आहे. "तू नसेल तर दुसरा असेल" हा संदेश देत पक्षाने आपली जागा रिक्त ठेवणार नसल्याचे दाखवून दिले आहे.
राहुरीत घडलेल्या या नाट्यमय घडामोडी केवळ स्थानिक पातळीपुरत्या मर्यादित आहेत की याचे पडसाद जिल्ह्याच्या इतर राजकारणावरही पडणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. तनपुरेंची माघार आणि मोकाटेंचा अर्ज यामागे काही राजकीय तडजोड झाली आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. विशेषतः राहुरीच्या स्थानिक राजकारणात विखे विरुद्ध तनपुरे असा संघर्ष नेहमीच पाहायला मिळाला आहे, अशा वेळी झालेली ही 'भेट' आणि त्यानंतर झालेली ही उलथापालथ राजकीय विश्लेषकांसाठी चर्चेचा विषय ठरली आहे.
ऐनवेळी झालेल्या या बदलामुळे मतदारांमध्ये काहीसा संभ्रम निर्माण झाला आहे. निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये या 'समझोत्या'च्या चर्चेमुळे नाराजी आहे की हे पक्षाचे धोरण आहे, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईलच. मात्र, गोविंदराव मोकाटे यांच्या उमेदवारीमुळे आता राहुरीची लढत अधिक चुरशीची होणार, हे मात्र नक्की

# राज्यातील 829 शाळा, 794 तुकड्या बंद होणार ?



अहिल्यानगर/ प्रशांत बाफना
राज्यातील कायम विना अनुदान तत्त्वावर मान्यता मिळालेल्या आणि वारंवार मूल्यमापनात अपात्र ठरलेल्या ८२९ शाळा आणि ७९४ तुकड्या वेतन अनुदानासाठी कायमस्वरूपी अपात्र घोषित करण्यात आल्या आहेत. अपात्र ठरलेल्या शाळांमध्ये माध्यमिकच्या ३२४, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या ५०५ यांचा समावेश आहे. शासनाने यापूर्वी विविध शासन निर्णयांद्वारे अशा शाळांसाठी सुधारित मूल्यमापन निकष निश्चित केले होते. त्या निकषांनुसार पात्र ठरणाऱ्या शाळांना टप्प्याटप्प्याने वेतन अनुदान देण्यात आले होते. मात्र, अनेक वेळा मूल्यमापन करूनही काही शाळा सतत अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्याने सरकारने हे कठोर पाऊल उचलले आहे.
नियमांनुसार एखादी शाळा सलग तीन वर्षे अपात्र ठरल्यास तिची मान्यता रद्द करण्याची तरतूद आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने ९ डिसेंबर २०१६ रोजी दिलेल्या आदेशात १५ नोव्हेंबर २०११ च्या शासन निर्णयाला वैध ठरवत पात्रतेचे निकष स्पष्ट केले होते. त्यानुसार केवळ निकष पूर्ण करणाऱ्या शाळांनाच अनुदान मिळणार आहे. या निकषांनुसार पात्र ठरणाऱ्या शाळांना टप्प्याटप्प्याने वेतन अनुदान देण्यात आले होते. मात्र, अनेक वेळा मूल्यमापन करूनही काही शाळा सतत अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे कायम विना अनुदान तत्त्वावर मान्यता मिळालेल्या आणि वारंवार मूल्यमापनात अपात्र ठरलेल्या ८२९ शाळा आणि ७९४ तुकड्या वेतन अनुदानासाठी कायमस्वरूपी अपात्र घोषित करण्यात आले आहे.
अपात्र ठरलेल्या शाळांमध्ये माध्यमिकच्या ३२४, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या ५०५ यांचा समावेश आहे. यामध्ये मुंबई महानगर प्रदेशातील शाळांचा समावेश आहे. ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक ६८ संस्था अपात्र ठरल्या असून, मुंबईत ५४ आणि पालघरमध्ये ४६ संस्था या यादीत आहेत. म्हणजेच या तीन जिल्ह्यांमध्ये मिळूनच १६८ संस्थांचे सरकारी अनुदान बंद होणार आहे. पुणे, रायगड आणि नाशिक जिल्ह्यांतील संस्थांनाही या निर्णयाचा फटका बसला आहे. ग्रामीण भागातील काही जिल्ह्यांमध्येही अशीच परिस्थिती दिसून येत आहे

# शिक्षक संघाचा 21 एप्रिलपासून संपात सहभागी होण्याचा निर्णय..





सोयगाव ता..
/ प्रतिनिधी.. सुनील चोरमले..
राज्य सरकारी कर्मचारी व शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी २१ एप्रिल २०२६ पासून पुकारण्यात आलेल्या बेमुदत संपात मराठवाडा शिक्षक संघ सक्रिय सहभागी होणार आहे. हा निर्णय परळी येथील शिक्षक भवनात झालेल्या केंद्रीय कार्यकारिणी बैठकीत एकमुखी घेण्यात आला.
बैठकीत सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू करणे, रिक्त जागा भरणे, सेवानिवृत्ती वय ६० वर्षे करणे, शिक्षकांना १०-२०-३० लाभ योजना लागू करणे तसेच जुन्या पेन्शनसह इतर मागण्यांसाठी संपात सहभागी होण्याचे ठरले.
याशिवाय, शासनाने वारंवार आश्वासने देऊनही मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच संप यशस्वी करण्यासाठी मराठवाड्यातील सर्व शिक्षकांनी एकजुटीने सहभागी व्हावे, असे आवाहनही बैठकीत करण्यात आले.
बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्ञानोबा वरवट्टे होते. यावेळी पी.एस. घाडगे, राजकुमार कदम, ए.बी. औताडे, टी.जी. पवार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत विविध शैक्षणिक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.
बैठकीपूर्वी दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शेवटी आभार प्रदर्शन शेरखाने यांनी केले.

# पावसाळ्यापूर्वी मनपाने घेतला 'हा' निर्णय,

## पहिल्या टप्प्यात सोमवारपासून तीन ओढे नाल्यातील साफसफाई सुरू / टप्प्याटप्प्याने मशीन वाढवून पावसाळ्यापूर्वी नालेसफाई पूर्ण करणार : आयुक्त यशवंत डांगे

अहिल्यानगर / प्रशांत बाफना
दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पावसाळ्यापूर्वी शहरातील ओढे व नाल्यांची साफसफाई सुरू करण्यात आली आहे. सुरुवातीला पहिल्या टप्प्यात तीन प्रमुख ओढे व नाल्यांची साफसफाई सुरू करण्यात आली आहे. टप्प्याटप्प्याने मशीनची संख्या वाढवून सफाईच्या कामाला गती देण्यात येईल. पावसाळा सुरू होण्यापूर्वी नालेसफाईचे काम पूर्ण केले जाणार असल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली. पावसाळापूर्व नालेसफाईच्या कामासाठी महानगरपालिकेने नियोजन करून कामाला सुरुवात केली आहे. सोमवारी सनी पॅलेस ते अभियंता कॉलनी, भगवान बाबा चौक, शिरसाठ मळा, गावडे मळा, गजराज ड्रायक्लिनर, डी मार्ट, अर्जुन वॉशिंग सेंटर, कराळे क्लब हाऊस, सिना नदीपर्यंत, तसेच कला नगर, नरहरी नगर, कुष्ठधाम रोड, रासने नगर, पंचशील हॉटेल, बालिकाश्रम रोड, शिंदे मळा, ताठे मळा, भूतकरवाडी पम्पिंग स्टेशन सीनानदीपर्यंत या सावेडी उपनगरातील दोन प्रमुख नाल्यांची व सारसनगर परिसरातील भिंगार नाल्याची साफसफाई सुरू करण्यात आली आहे. तीन पोकलेन मशीन उपलब्ध करून हे काम सुरू करण्यात आले आहे. उद्या आणखी एक मशीन उपलब्ध होईल व आणखी एका नाल्याची साफसफाई सुरू होईल. शहरातील सर्व ओढे व नाल्यांची साफसफाई पावसाळ्यापूर्वी पूर्ण होईल, या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. अतिक्रमण निर्मूलन विभागाला याबाबत सूचना देण्यात आल्या असून टप्प्याटप्प्याने पोकलेन मशीनची संख्या वाढवून कामाला गती देण्यात येईल. पावसाळा सुरू होण्यापूर्वी नालेसफाईचे काम पूर्ण



केले जाईल. नालेसफाई दरम्यान ओढे व नाल्यातून काढण्यात आलेला गाळ तेथेच न टाकता तो तात्काळ उचलून नेण्याबाबतही उपाययोजना व नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले

# उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातर्फे भोकरदन येथे पोलीस पाटील प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

उपविभाग भोकरदन अंतर्गत पोलीस ठाणे भोकरदन, जाफ्राबाद, हसनाबाद टेंभुर्णी आणि पारध या हददीतील गावांमध्ये नव्याने नियुक्त झालेले व जुने कार्यरत असलेल्या सर्व पोलीस पाटील यांना पोलीस पाटील पदाचे काम करत असतांना त्यांना त्यांचे कायदेविषयक अधिकार व कर्तव्य यांची माहीती व्हावी, तसेच त्यांना चांगले कामकाज करता यावे, त्यांच्या दैनंदीन कामकाजामध्ये सुधारणा व्हावी.
या उददेशाने सर्व पोलीस पाटील यांचे साठी पोलीस अधिक्षक श्री अजयकुमार बंसल व अपर पोलीस अधिक्षक श्री आयुष नोपाणी यांचे मार्गदर्शनात एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन पंचायत समीती कार्यालय भोकरदन येथील नवीन इमारतीचे सभागृहा मध्ये करण्यात आले होते. या प्रशिक्षणाला 177 पोलीस पाटील उपस्थीत होते.त्यामध्ये डॉ.श्री



नितीन कटेकर उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन हे प्रमुख मार्गदर्शक होते. सदर पोलीस पाटील प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये एकुण तीन सत्रामध्ये प्रशिक्षण घेण्यात आले आहे.त्यात डॉ.श्री नितीन कटेकर उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन यांनी 1. महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम 1967 मधील तरतुदी, पोलीस पाटील पदाचा इतिहास, नेमणुक, कर्तव्य, अधिकार, कामाची कार्यपध्दती पोलीस पाटील अभिलेख, प्रतिबंधक उपाययोजना, गुन्हेगार माहीती गोळा करणे,समन्स, वॉरंट, झडती,बेवारस मालमत्ता, निवडणुक पुतळा, ग्रामरक्षक दल, गावातील गुप्तवार्ता इ.संदर्भाने दोन सत्रात सखोल मार्गदर्शन केले. मसपोनि श्री आरती जाधवं कदीम पोलीस ठाणे यांनी महिला विषयक जनजागृती कायदे व पोक्सो कायदा तसेच गावातील पोलीस पाटील यांची महिला गुन्हे संदर्भाने जबाबदारी,गुड टच बॅड टच, भरोसा सेल बाबत मार्गदर्शन केले. पोउपनि श्री योगेश चव्हाण सायबर विभाग जालना यांनी सायबर सुरक्षा जनजागृती,सायबर फ्रॉड,युपीआय आयडी, फेक अकांउन्ट, सोशल मिडीया स्कॅम, डिजीटल अरेस्ट,व्हाटसअप हॅकींग, लहान मुलांकडे मोबाइल दिल्यास होणारे दुष्परीणाम,एम कवच सेक्युरीटी सोलुशन,फेक कॉल इ बाबतीत मार्गदर्शन केले.

# आवसगाव जिल्हा परिषद शाळेला IDBI बँकेकडून CSR निधीतून अत्याधुनिक RO पाणी शुद्धीकरण प्रकल्प भेट

## शाखा व्यवस्थापक श्री दिपक कोल्हे व त्यांचे सहकारी यांच्या हस्ते वितरण



केज/ प्रतिनिधी
दि. 4 एप्रिल रोजी आवसगाव जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, आवासगाव येथे IDBI बँकेच्या सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांतर्गत अत्याधुनिक RO पाणी शुद्धीकरण प्रकल्प प्रदान करण्यात आला. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. गावातील नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले आहे.
कार्यक्रम उत्साहात पार पडला. या वेळी IDBI बँकेचे शाखा व्यवस्थापक दीपक कोल्हे, व्हॉइस मॅनेजर आदित्य किसन तसेच कर्मचारी अतुल गोरे उपस्थित होते.
शाळेचे मुख्याध्यापक कस्पटे सर यांनी दीपक कोल्हे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला, तर हंडीबाग सर यांनी आदित्य किसन यांचा सन्मान केला. देशमुख सर यांनी सर्व बँक कर्मचाऱ्यांचा गौरव करून आभार व्यक्त केले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रस्तावना आणि समारोप तानाजी जाधव सर यांनी प्रभावी व ओघवत्या शब्दांत सादर केला. यावेळी आवासगावचे सरपंच विश्वास शिनगारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात शाळेच्या विकासासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली व बँकेचे आभार मानले.
आपल्या मनोगतात बँक मॅनेजर दीपक कोल्हे यांनी शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी IDBI बँक कटिबद्ध असल्याचे सांगितले.
पुढील वर्षी CSR निधीतून शाळेसाठी स्वच्छतागृह उभारणी तसेच विद्यार्थ्यांसाठी डेस्क उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. "विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाल्यास त्यांचा शैक्षणिक दर्जा निश्चितच उंचावेल," असे ते म्हणाले.
शाळेतील शिक्षकांनीही या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, RO प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल होईल, असा विश्वास व्यक्त केला.
विशेषतः उन्हाळ्याच्या काळात स्वच्छ पाण्याची उपलब्धता ही मोठी गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.
कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमामुळे शाळेच्या विकासाला चालना मिळणार असून विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि शिक्षणासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणूक...! एकीकडे वडिलांचा वारसा जपण्याची लढाई तर दुसरीकडे पराभवाचा वचपा काढण्याची घाई...!

## सगळीकडे मात्र एकच उत्सुकता... 'काय होईल' 'कसं होईल'?

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना
माजी मंत्री स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या आकस्मिक निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेतली जात आहे आणि त्यासाठी उद्या (दि. ६) प्रचंड असं शक्ती प्रदर्शन करत माजी मंत्री कर्डिले यांचे सुपुत्र भाजपचे युवा नेते, पैलवान अक्षय कर्डिले

हे या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज सादर करणार आहेत. तत्पूर्वी राहुरीतल्या रेल्वेस्टेशन रस्त्यालगतच्या पांडुरंग लॉन्समध्ये कर्डिले समर्थकांचा मेळावा होईल आणि त्यानंतर उमेदवारी अर्ज सादर केला जाईल. दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) माजी मंत्री प्राजक्ता तनपुरे

हे ही पोटनिवडणूक अपक्ष लढविणार असल्याचं बोललं जात असलं तरी अद्यापपर्यंत तरी या संदर्भात त्यांची कुठलीही हालचाल दिसून आलेली नाही. तरीदेखील युवा नेते अक्षय कर्डिले यांनी उमेदवारी अर्ज सादर केल्यानंतर कदाचित माजी मंत्री तनपुरे हे त्यांचा उमेदवार अर्ज सादर करतील. दरम्यान, या पोटनिवडणुकीचं थोडक्यात वर्णन करायचं झालं तर एकीकडे वडिलांचा वारसा जपण्याची लढाई तर दुसरीकडे पराभवाचा वचपा काढण्याची घाई असंच करावं लागेल. तूर्तास तरी या पोटनिवडणुकीविषयी
सगळीकडे एकच उत्सुकता आहे , ती म्हणजे 'काय होईल' आणि 'कसं होईल'?

स्वतःच्या मतदारसंघातले मतदार आणि कार्यकर्त्यांच्या भावना जपण्याचं काम माजी मंत्री कर्डिले यांनी गेल्या 25 ते 30 वर्षांमध्ये अतिशय उत्कृष्टपणे केलंय. काही वर्षे त्यांनी घाटाखालच्या भागाचं म्हणजे नेवासा विधानसभा मतदारसंघाचंही नेतृत्व केलं होतं. त्या काळात माजी मंत्री कर्डिले यांनी तयार केलेले कार्यकर्ते आजही कर्डिले घराण्याशी जोडले गेलेले आहेत. माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी एकदा का कार्यकर्त्यांच्या खांद्यावर हात ठेवला तर तो कार्यकर्ता कर्डिले यांना कधीच विसरत नव्हता. माजी मंत्री कर्डिले हे शब्दाला इतके पक्के होते, की त्यांनी एकदा कार्यकर्त्यांना शब्द दिला, की तो खरा करून दाखविण्यासाठी काहीही करण्याची त्यांची तयारी होती.

याचं एक उदाहरण द्यायचं झालं तर राहुरी तालुक्यातील एका कार्यकर्त्यानं माजी मंत्री शिवाजीराव कर्डिल यांना फोन केला, की 'साहेब म्हैस व्याली आहे. खरवस खायला या'. माजी मंत्री कर्डिले यांनी त्या कार्यकर्त्याला विचारलं, 'कधी येऊ'? तो कार्यकर्ता म्हणाला, 'सायंकाळी पाच किंवा सहा वाजेपर्यंत कधी या'. आश्चर्याची बाब म्हणजे बरोबर सव्वा सहा वाजता माजी मंत्री कर्डिले यांची गाडी त्या कार्यकर्त्याच्या घराच्या दारात उभी होती. आजही तो कार्यकर्ता पाणावलेल्या डोळ्यांनी तो प्रसंग सांगतो आहे. असे अनेक प्रसंग आहेत, जे माजी मंत्री कर्डिले यांच्यासह त्यांच्या सर्वच कार्यकर्त्यांसाठी अविस्मरणीय आहेत.
दुर्दैवानं माजी मंत्री कर्डिले आज हयात नसले तरी त्यांच्या विचाराचा वारसा जपण्याची लढाई त्यांचे पुत्र पैलवान अक्षय कर्डिले हे लढत आहेत. विशेष म्हणजे या लढाईत राहुरी, पाथर्डी, आणि नगर तालुक्यातले माजी मंत्री कर्डिले यांच्या विचारांवर आणि कर्डिले परिवारावर प्रेम करणारे हजारो कार्यकर्ते अक्षय कर्डिले यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत.
दुसऱ्या बाजूला माजी मंत्री प्राजक्त तनपुरे हे मागच्या निवडणुकीत झालेल्या पराभवाचा वसपा काढण्याच्या घाईत आहेत. त्यामुळे अक्षय कर्डिले आणि त्यांच्या कार्यकर्त्यांसमोर तनपुरे यांचं प्रचंड तगडं असं आव्हान उभं आहे. माजी खासदार प्रसाद तनपुरे आणि मामा जयंत पाटील त्याचप्रमाणे राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) सर्वेसर्वा असलेले शरद पवार यांची ताकद माजी मंत्री तनपुरे यांच्या पाठीशी आहे. त्यामुळे अक्षय कर्डिले यांना ही पोटनिवडणूक निवडणूक वाटते तितकी सोपी नक्कीच नाही. तनपुरे आणि कर्डिले यांच्या या लढाईत आणखी अनेक जण सहभागी आहेत. मात्र त्या सर्वांपासून तनपुरे आणि कर्डिलेंपैकी नक्की कोणाला, कसा आणि किती धोका आहे, कोण कोणाची मतं खाणार, हे मात्र मतमोजणीनंतर जाहीर होणाऱ्या निकालातूनच समजणार आहे.

भाजपचे युवा नेते अक्षय कर्डिले यांच्याविषयी जर बोलायचं झालं तर वडिलांप्रमाणेच ते सुद्धा पायाला भिंगरी लावून मतदारसंघात सातत्याने फिरत आहेत. मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. त्यांच्या समस्या जाणून घेत आहेत. त्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी अधिकाऱ्यांशी फोनवर संपर्क साधत आहेत. त्या समस्या कशा पद्धतीने सुटतील, यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. माजी मंत्री कर्डिले यांच्याप्रमाणे अक्षय कर्डिले हे सकाळी दहा वाजेपर्यंत त्यांचा जनता दरबार झाल्यानंतर लगेच मतदार संघाकडे रवाना होतात. आजपर्यंत त्यांनी राहुरी विधानसभा मतदारसंघ अक्षरशः पिंजून काढला आहे. सकाळी एकदा घर सोडलं, की रात्रीच उशिरा घरी यायचं. सर्व कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेऊन, त्यांच्या समस्या सोडूनच घरी यायचं, असा माजी मंत्री कर्डिले यांचा शिरस्ता अक्षय कर्डिले यांनी आजही सुरुच ठेवला आहे.
माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्याविषयी जर बोलायचं झालं तर कार्यकर्त्यांना तनपुरे यांची भेट घेण्यासाठी राहुरीतल्या तनपुरे यांच्या वाड्यावर जावं लागतं. तिथं तासंतास बसल्यानंतर तनपुरे साहेबांची भेट होते आणि आपल्या समस्यासंदर्भात जुजबी चर्चा केल्यानंतर 'तुम्ही तुमच्या घरी आणि आम्ही आमच्या घरी' असं होतं. माजी मंत्री कर्डिले यांच्याप्रमाणे युवा नेते अक्षय कर्डिले यांनी ज्या पद्धतीनं आजही जनता दरबार सुरु ठेवला आहे, त्या पद्धतीनं माजी मंत्री तनपुरे यांचा जनता दरबार कधी भरला आणि त्या जनता दरबारातून सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे प्रश्न मार्गी लागले, असं आजपर्यंत तरी ऐकिवात नाही. कर्डिले पिता-पुत्राप्रमाणे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे हे कार्यकर्त्यांना नक्की किती वेळ देतात, राहुरी विधानसभा मतदारसंघात त्यांनी आतापर्यंत किती दौरे काढले, या दौऱ्यांमध्ये किती वेळा त्यांनी कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेतल्या, यातून किती कार्यकर्त्यांच्या समस्या मार्गी लागल्या, हा मोठा संशोधनाचा विषय आहे.
कौन कितना है पानी में...?

सर्वसामान्य मतदार आणि कार्यकर्ते आपल्या नेत्याच्या प्रत्येक हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवत असतात. आपल्या नेत्याने आपल्या समस्या मार्गी लावण्यासंदर्भात किती प्रयत्न केले, आपल्या नेत्याने आपल्याला किती वेळ दिला, आपल्या नेत्याची आपल्याबरोबर कशा पद्धतीची वागणूक होती आणि आहे, आपल्या नेत्याचं नाव सांगितलं तर प्रशासकीय कार्यालयांत किती वेळात आपलं काम मार्गी लागतं, आपल्या नेत्याच्या शब्दाला सरकार पातळीवर कितपत किंमत आहे, या सर्वांची चाचपणी सर्वसामान्य मतदार आणि कार्यकर्ता करत असतो. आता माजी मंत्री प्राजक्ता तनपुरे आणि युवा नेते अक्षय कर्डिले यांच्यामधला फरक 'स्पष्ट करा', या विषयावरचा निबंध राहुरी विधानसभा मतदारसंघातल्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांसह मतदारांना लिहायला सांगितला तरच त्यातून बरंच काही बाहेर येईल आणि त्यानंतरच सर्वांना हे समजून येईल, की माजी मंत्री तनपुरे आणि युवा नेते अक्षय कर्डिले यांच्यात 'कौन कितना है पानी में'...?

# कंक्राळा येथे 45 फूट विहिरीत छोटा हत्ती कोसळला

## गव्हाचे मोठे नुकसान..



.. सोयगाव /तालुका .. प्रतिनिधी : सुनील चोरमले..
... दिनांक 5 एप्रिल रविवार रोजी सोयगाव तालुक्यात कंक्राळा गावाजवळ रविवारी दुपारी सुमारास गव्हाच्या पोत्यांनी भरलेले छोटा हत्ती वाहन अचानक 45 फूट खोल विहिरीत कोसळल्याची घटना घडली. अज्ञात व्यक्तीने वाहनाची चावी फिरवून ते सुरू केल्याने हा प्रकार घडल्याचे सांगितले जात आहे. सुदैवाने वाहनात कोणीही नसल्याने जीवितहानी टळली.
या घटनेत सुमारे 8 ते 10 क्विंटल गव्हाचे नुकसान झाले. विहिरीत सुमारे 40 फूट पाणी असल्याने वाहन बाहेर काढणे आव्हानात्मक ठरले. माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन सुमारे दीड तासांच्या प्रयत्नांनंतर वाहन बाहेर काढले. या कामात जीवन उबाळे यांनी पुढाकार घेत विहिरीत उतरून वाहन दोरी व यंत्राच्या सहाय्याने बाहेर काढले. सोयगाव पोलिसांनी घटनेची नोंद घेतली आहे

# स्मृतिशेष ह.भ.प.मधुकर महाराज बारूळकर यांचे वृक्ष लागवड करून अस्थि विसर्जन

जिल्हा प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : वारकरी सांप्रदायाचे आदर्श, कीर्तनकार, प्रबोधनकार स्मृतीशेष ह.भ.प. मधुकर महाराज बारूळकर हे दिनांक ३१ मार्च रोजी विठ्ठल चरणी लीन झाले. महाराष्ट्रावर दुःखाची शोककळा पसरली, सर्वांनी जड अंतकरणाने महाराजांना निरोप दिला.
आज तिसऱ्या दिवशी त्यांच्या कुटुंबीयांनी महाराजांचं अस्तिविसर्जन आपल्या शेतात केलं. यावेळी शेतामध्ये महाराजांच्या प्रतिमेचं पूजन करून, जिजाऊ वंदना घेण्यात आली. त्यांनतर खड्ड्यात अस्थी पुरून त्यावर देशीवादी वृक्षांची लागवड करण्यात आली. आणि आज तिसऱ्या दिवशी सुतक फिटलं हे भाऊकीला जाहीर करण्यात आलं. महापुरुषांच्या वारशाप्रमाणे अगदी साध्या पद्धतीने महाराजांचे शेवटचे विधी करण्यात आले. उरलेली राख शेतात पिकांना टाकण्यात आली. कोणतही जलप्रदूषण वगैरे न करता. हा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील चुंगी या गावाहुन ह.भ.प.नाथ महाराज उपस्थित होते तर परभणी वरून ह.भ.प.धर्मकीर्ती महाराज परभणीकर उपस्थित होते. यावेळी बारडहुन केतन



देशमुख, केदारनाथ देशमुख, त्यांच बरोबर नांदेडहुन पंडित कदम ,बिडवरून जाधव व महाराष्ट्रातील विविध ठिकानांवरून मातब्बर मान्यवर मंडळी उपस्थित होती.
त्यांच्या तीन मुलांनी ही वृक्षलागवड करत शेवटचे विधी केले. यावेळी मीराताई कदम, दिलीप कदम व ज्ञानेश्वर कदम या महाराजांच्या मुलांनी हा वैचारिक वारसा पुढे चालवण्याचे आश्वासन सर्वांना दिले.

दैनिक लोकआरंभ
मंगळवार ७ एप्रिल २०२६
www.lokaarambh.com



# गोकुंद्यातील महिलांचे उपोषण सरपंच व प्रशासनाच्या आश्वासनानंतर तूर्तास स्थगित

## उग्र आंदोलन व उपोषण करण्यास ग्रामपंचायतीने भाग पाडू नये अशा ग्रामस्थ महिलांच्या तीव्र भावना

जिल्हा प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : तालुक्यातील गोकुंदा ग्रामपंचायत वार्ड क्रमांक ५ या लोकवस्तीतील छत्रपती संभाजी महाराज वस्तीगृहाच्या समोरील रस्त्या व नालीचे काम त्वरित दुरुस्ती करून द्यावे या व अन्य मागण्यासाठी दि.६-एप्रिल रोजी श्रीमती राखी राजू राठोड,शोभा बिभीषण सानप,सविता संतोष आडे यांच्यासह अन्य महिला व पुरुष गोकुंदा ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषणास बसले होते.

गोकुंदा ग्रामपंचायत वार्ड क्रमांक पाच येथील वस्तीमध्ये अनेक वर्षांपासून कच्चा रस्ता असून पावसाळ्यामध्ये हा रस्ता पूर्णपणे चिखमय होतो.या रस्त्यावरून पायी सुद्धा चालणं अशक्य आहे.पावसाळ्यात या वस्तीतील वयोवृद्ध नागरिकांसह शाळकरी विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा




लागतो.वस्तीमध्ये अंगणवाडी शाळा तसेच छत्रपती संभाजी महाराज मुलांचे वस्तीगृह आहे.यामुळे जून ते ऑक्टोबर या पावसाळ्याच्या दिवसांमध्ये शाळकरी मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. वारंवार या मागणी संदर्भात लेखी निवेदन देऊन सुद्धा या समस्या विषयी ग्रामपंचायत टाळाटाळ करत असल्याच्या भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

उपोषणकर्त्या महिलांच्या मागण्यासंदर्भात ग्रामपंचायत व प्रशासनाने एका महिन्यांच्या कालावधीमध्ये काम पूर्ण करू असे लिखित आश्वासन दिल्यानंतर महिलांनी आपले उपोषण तूर्तास स्थगित केले आहे.जर एक महिन्याच्या कालावधीमध्ये मागण्यांची पूर्तता न झाल्यास मात्र याऊनही उग्र आंदोलन व उपोषण करण्यास ग्रामपंचायतीने भाग पाडू नये अशा ग्रामस्थ महिलांच्या तीव्र भावना होत्या.दिलेल्या आश्वासनाची ग्रामपंचायत पूर्तता करते का याकडे मात्र ग्रामस्थांचे लक्ष लागून आहे.

## बीडमध्ये आंबेडकर-फुले जयंती पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक; सौहार्द राखण्याचे पोलीस प्रशासनाचे आवाहन

बीड / प्रतिनिधी

आगामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व महामानव महात्मा ज्योतिबा फुले जयंतीच्या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलीस ठाण्यात आज दुपारी २ वाजता शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. शहरात उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि सर्वत्र शांतता व ऐक्य टिकून राहावे, या उद्देशाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीस SDPO श्री व्यंकटराम (IPS), पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक खेडकर, बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जाधव, बीड शहर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राठोड, पोलीस हवालदार शहेनशाह सय्यद, पोलीस अंमलदार नवनाथ राख यांच्यासह पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत शांतता समिती सदस्यांना मार्गदर्शन करताना SDPO व्यंकटराम यांनी जयंती उत्सव शांततेत, संयमाने व परस्पर सौहार्द राखत साजरा करण्याचे आवाहन केले. कोणत्याही प्रकारच्या अफवा, वाद किंवा गैरसमज टाळून सर्व समाजघटकांनी एकत्र येत सामाजिक एकोपा जपावा, असेही त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. महान समाजसुधारकांच्या जयंती हा केवळ उत्सव नसून सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा दिवस आहे, याची जाणीव ठेवून नागरिकांनी जबाबदारीने सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

यावेळी शांतता समिती चे सदस्य व समाजसेवक मुसा खान पठाण, अयुब खान पठाण, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम वीर तसेच पत्रकार पठाण अमरजान यांनीही विविध सूचना मांडत प्रशासनाला सहकार्य करण्याची भूमिका स्पष्ट केली.

बैठकीस बीड शहरातील विविध राजकीय पदाधिकारी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व शांतता समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी जयंती उत्सव शांततेत, शिस्तीत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी सर्वांनी एकमुखाने सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# स्वत:ला ओबीसी नेते म्हणवून घेणारे लोकप्रतिनिधी जातनिहाय जनगणनेवर गप्प का?- अर्जुन दळे

बीड (प्रतिनिधी): केंद्र सरकारकडून ओबीसी जातनिहाय जनगणनेच्या आश्वासनाचे पालन होताना दिसत नाही. ओबीसींच्या जातीसाठी जनगणनेत स्वतंत्र रकाना (कॉलम) नाही. या पार्श्वभूमीवर सर्व ओबीसी मंत्री, खासदार आणि आमदारांनी केंद्र सरकारला जाब विचारायला हवा, परंतु मराठवाड्यातील स्वत:ला ओबीसी नेते म्हणवून घेणारे राष्ट्रीय लोकप्रतिनिधी, मंत्री, खासदार, मौन बाळगून असून या प्रश्नावर कधी आवाज उठविणार असा सवाल राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केला आहे.

केंद्र सरकारने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच ओबीसींच्या जातनिहाय जनगणनेची घोषणा केली. 22 जानेवारी 2026 रोजी 33 प्रश्नांची सूची राजपत्रात प्रकाशित झाली. या यादीत घर क्रमांक, कुटुंब प्रमुखाचे नाव, लिंग, घरातील खोल्यांची संख्या, पिण्याच्या पाण्याचे स्रोत, शौचालय, वीज, इंटरनेट, टीव्ही, मोबाईलसह इतर मूलभूत



माहिती विचारण्यात आली आहे. तथापि, बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि जमातींचा स्पष्ट उल्लेख असून, इतर प्रवर्गासाठी ‘इतर’ असा शब्द वापरण्यात आला आहे. ओबीसी समाजाचा स्पष्ट उल्लेख नाही, ज्यामुळे जनगणनेवरून प्रश्न निर्माण झाले आहेत. यावर राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्यावतीने दिल्ली येथे जंतरमंतर येथे दि.23 मार्च 2026 रोजी आंदोलन केले होते.

मात्र सर्व ओबीसी मंत्री, खासदार आणि आमदारांनी मौन बाळगले आहे. त्यामुळे समाज संतप्त झाला, असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांनी म्हटले आहे. ओबीसींच्या प्रदीर्घ लढ्यानंतर सरकारला जातनिहाय जनगणनेची घोषणा करावी लागली. मात्र प्रत्यक्षात जनगणना करताना वचन विसरले गेले आहे. ही समाजासोबत केलेली दगाबाजी कदापि सहन केली जाणार नाही. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, गावागावांत

केंद्र सरकारच्या 30 मे 2025 मंत्रिमंडळ बैठकीत जातनिहाय जनगणनेचा निर्णय झाला तेव्हा निर्णयाचे स्वागत करणारे सरकार मधील आमदार, खासदार प्रत्यक्षात दिनांक 22 जानेवारी 2026 ला जनगणना आयुक्तांनी काढलेल्या राजपत्रावर गप्प का?

- अर्जुन दळे, जिल्हाध्यक्ष, राष्ट्रीय ओबीसी महासंघ,बीड

जनजागृती करून समाजाला जागरूक केले जाईल, असे ते म्हणाले. ओबीसींची जनगणना ऑक्टोबर 2026 पासून जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये सुरू होणार असून, उर्वरित भागात मार्च 2027 पासून होईल, असे आधी स्पष्ट करण्यात आले होते.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

## डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

किल्ले धारूर/अविनाश जगताप

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागातर्फे अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सीए श्री.अंकुश फुटाणे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना करिअरमध्ये यश मिळवण्यासाठी सातत्य, प्रामाणिकपणा आणि कौशल्यविकासाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. जीवनात सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमापूजनाने झाली. मनोगतातून ऋतुजा सोळंके, पूजा लोकरे, सुरज गायकवाड या विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. इंद्रजीत भगत यांनी केले. तर सूत्रसंचालन ऋतुजा सोळंके यांनी केले. आभार ओम सुरवसे यांनी मानले. हा निरोप समारंभ विद्यार्थ्यांसाठी भावनिक व संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या नियोजनासंबंधी डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा.आदित्य सोळंके, प्रा.उघडे यांनी कार्यक्रमाकरिता सहकार्य केले.




## धारूर येथील तालुका क्रीडा संकुलनात ओपन जिम चे उद्घाटन



किल्ले धारूर /प्रतिनिधी

तालुका क्रीडा संकुल धारूर येथील मैदानात ओपन जिम चे उद्घाटन दिनांक 5 एप्रिल रोजी धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब भवर यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी उपस्थित धारूर तालुका क्रीडा अधिकारी रूपाली यादव मॅडम, लवकुमार गव्हाणे, अशोक शिनगारे बीए शिंनगारे मुंजाराम निर्डे सर ,आनंद कंकाळ यांच्या उपस्थितीमध्ये उद्घाटन पार पाडले.

सदरील ओपन जिमचा उपयोग धारूर शहरवासीयांसाठी होणार असून आरोग्य सुदृढ होण्यासाठी या जिमचा उपयोग होणार आहे जिम जिम होणार आहे हे समजतात त्या परिसरातील क्रीडाप्रेमी यांच्यामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे हे सर्व श्रेय तालुका क्रीडा अधिकारी मॅडम यांच्या तत्परतेमुळे झालेले आहे असे जनतेच्या चर्चेतून कळते या तालुका क्रीडा संकुलासाठी मी पूर्ण प्रयत्न करून हे संकुल कार्यरत करण्याचा प्रयत्न करेल असेही मॅडमने त्या ठिकाणी ग्वाही दिली.

# बीड शहरवासीयांना प्रधानमंत्री आवास योजनेतून राज्य केंद्र सरकारच्या माध्यमातून 729 घरकुलांना मंजुरी भारतीय जनता पार्टीच्या प्रयत्नाला यश मा श्री नवनाथ जी शिराळे पाटील

## प्रधानमंत्री आवास योजनेतून बीड़ शहरात ७२९ घरकुलांना मंजुरी भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ शिराळे पाटील यांची माहिती

लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील व स्वीकृत नगरसेवक गोविंद शिराळे पाटील यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकाच्या माध्यमातून केले आहे .

बीड । प्रतिनिधी

सध्या भारतामध्ये देव देश धर्म यासाठी सातत्याने चालणारे सरकार देशातील नागरिकांना लाभले आहे मा श्री लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी साहेब हे देव देश धर्म या या उत्कृष्ट कार्यासाठी ते सातत्याने व्यस्त असतात व सर्व भारतातील तमाम सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांपर्यंत पर्यंत शासनाच्या विविध विकासात्मक योजना कशा पोहोचतील याच्यावर त्यांचा मोठा भर असतो याच अनुषंगाने महाराष्ट्र राज्यामध्ये देखील देव देश धर्म यासाठी सातत्याने कार्य करणारे महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष या लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब उर्फ सर्वांचे देवा भाऊ यांचे सरकार कार्यरत आहे या सरकारमध्ये या उपमुख्यमंत्री एकनाथ जी शिंदे साहेब व दुसऱ्या मा उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार व महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्ह्याच्या वतीने बीड शहरातील नागरिकांनी ऑनलाईन रमाई आवास योजनेसाठी केलेल्या घरकुल फॉर्म ला मंजुरी चांगल्या प्रकारे मिळावी घरकुलांना मंजुरी घ्यावी या साठी प्रस्ताव बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने व पाठवण्यात आला होता या प्रस्तावावर स्वीकृत नगरसेवक गोविंद शिराळे पाटील यांची देखील सिग्नेचर आहे या घरकुल आवास योजनेच्या प्रस्तावावर राज्य सरकारने प्रयत्न करून केंद्र सरकारकडून मंजुरी मिळून बीड शहराला खूप मोठी घरकुलाची मंजुरी देऊन बीडकरांचे मन जिंकले आहेत

बीड नगर परिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना शहरी २.० अंतर्गत ७२९ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. ज्या लाभार्थ्यांना घरकुल मंजुर झाले आहे अशा लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याकरीता मालकीच्या जागेवर बांधकाम नकाशा, लोकेशन प्लान व बांधकाम परवानगी घेऊन त्वरीत बांधकाम सुरु करावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील व बीड नगर स्वीकृत नगरसेवक एडवोकेट गोविंद शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून केले आहे.

सर्वांसाठी घरे अन्न वस्त्र हे अत्यंत आवश्यक आहे यासाठी भारताचे लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्र भाई मोदी साहेब हे सातत्याने लोकांपर्यंत योजना कशा उपलब्ध होतील त्याच्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करतात व



स्वतः या संकल्पनेवर आधारीत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बीड शहरातील नागरीकांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ऑनलाईन अर्ज सादर केले होते. सदर योजने अंतर्गत बीड शहरातील ७२९ लाभार्थ्यांचे घरकुल मंजुर झाले आहे. म्हणून प्रधानमंत्री महोदय व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब तसेच भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय नेत्या तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे सर्व बीड जिल्ह्यातून त्यांच्या उत्कृष्ट कर्तव्याच्या बाबतीत नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे व बीड शहरातील ज्यांना घरकुल मंजूर झाले आहे अशा मंजुर लाभार्थ्यांची यादी नगर परिषद कार्यालय या ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आलेले आहे तरी बीड शहरातील सर्व नागरिकांनी या घरकुल योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा काही अडचण असल्यास डायरेक्ट आमच्याशी संपर्क करावा असे आव्हान देखील या प्रसिद्ध पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील तसेच बीड नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक एडवोकेट गोविंद शिरोळे पाटील यांनी केले आहे

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com